# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१

E-Mail :- desk5@dtemaharastra.gov.in    Web:- http://www.dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ

जा. क्र.५(३)/अभातशिप/७ वा वेआ/२०१९/८८.

दिनांक : 13 MAR 2019

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत तंत्रनिकेतने व तत्सम संस्था.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

2907


विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी / पदविका अभ्यासक्रमातील शिक्षकांना व समकक्ष पदांना ७ वेतन आयोग लागू करणेबाबत.

संदर्भ : १.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे दि.०१ मार्च,२०१९ ची अधिसूचना.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन पत्र क्र. सावेआ - १११९/(४४/१९)/तांशि - २, दि.८ मार्च, २०१९.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने उपरोक्त संदर्भाधिन अधिसूचनेव्दारे तंत्रशिक्षणातील पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षकांना व समकक्ष पदांना ७ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीची शिफारस केलेली आहे. (सदरच्या शिफारशींची प्रत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.) त्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षकांना व समकक्ष पदांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

तरी, आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन अधिसूचनेच्या व शासनाच्या पत्राच्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील शिक्षकांना व समकक्ष पदांना सदरच्या वेतनश्रेण्या लागू करावयाच्या झाल्यास त्याचा आर्थिक भार काढून सोबत जोडलेल्या तक्त्यात माहिती या कार्यालयास सादर करण्यात यावी. सदरची माहिती प्रथम प्राधान्याने दिनांक १६ मार्च, २०१९ पर्यंत या कार्यालयास ई-मेल तसेच पत्राव्दारे प्राप्त होईल अशा बेताने पाठविण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ),
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-२/७ वा आयोग/२०१९/ 1189    तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
13 MAR 2019

प्रत :- पुणे विभागातल सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांना तात्काळ आवश्यक कार्यवाहीस्तव सदरची माहिती ईमेलद्वारे तसेच पत्राद्वारे दिनांक १६/०३/२०१९ पर्यंत न चुकता संचालनालयास सादर करुन त्याची एक प्रत या विभागीय कार्यालयास सादर करण्यांत यावी.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.